# विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत

## श्री. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

कला शाखांतर्गत लघु शोध प्रकल्पाचा (Minor Research Project)

सादर केलेला

## लघुशोधप्रबंध

संशोधन विषय

# संत गणपती महाराज : व्यक्तित्त्व, कवित्त्व आणि कार्य.

संशोधनकर्ता

**डॉ. प्रमोद भी. गारोडे**

सहाय्यक प्राध्यापक

मराठी विभाग,

भ. शि. पाटील महाविद्यालय,

परतवाडा, जि. अमरावती

ऑगस्ट २०१५

Ref. :- UGC letter No. **File No. 23 - 2518 / 10 (WRO)**

# Summary of Findings

**निष्कर्ष :**

समाज सुधारक संत गणपती ऊर्फ हरी महाराजांनी सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला सुधारणावादातून स्पर्श केला नाही तर ती सामाजिक क्रांती होती. ब्राम्हण – ब्राम्हणेत्तर वादाला एक नवे वळण ज्यावेळी महाराष्ट्रात निर्माण झाले होते त्यावेळी महाराजांच्या सामाजिक क्रांतिचा जन्म झाला. भिक्षुक वृत्ती व पुरोहितशाही समाज जीवनातून नष्ट करून समाजाला सार्वजनिक व सामुदायिक जीवनाची दिशा दाखविण्याचे कार्य गणपती महाराजांनी केले. संत गणपती महाराजांच्या कार्याचा व त्यांच्या साहित्य लेखनाचा संशोधन पूर्वक अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष हाती लागतात ते पुढील प्रमाणे–

१ संत गणपती महाराजांच्या काळातील धार्मिक व सामाजिक परिस्थिती बुरसटलेल्या विचारांचा प्रभाव असलेली व शोषणाची व्यवस्था असलेली होती.

२ या पार्श्वभूमीवर संत गणपती महाराजांनी आपले समाजसुधारणेचे कार्य केले. त्याअनुशंगाने आपले समाज सुधारणावादी पुरोगामी विचार काव्याच्या माध्यमातून लिहून ठेवले.

३ आपले पुरोगामी विचार समाजाच्या मनापर्यंत पोहचावे म्हणून त्यांनी कीर्तनाचे माध्यम निवडले. आध्यात्मिक कीर्तनातून समाजप्रबोधन त्यांनी घडविले. त्यांनी अध्यात्माचे कुठेही स्तोंभ माजविले नाही तर समाज सुधारणेचे परखड विचार आपल्या कीर्तनातून तसेच काव्यातून व्यक्त केले.

४ संत गणपती महाराजांनी आपले पुरोगामी विचार अभंग काव्याच्या माध्यमातून पुढच्या पिढीसाठी लिहून ठेवले आहे. कारण त्यांचे विचार हे सर्वकालातीत विचार आहेत. ते आजही समाजाला फायद्याचे व दिशादर्शक असेच आहे.

५ संत गणपती महाराजांनी आपल्या साहित्यातून समाज वास्तवतेचे रूप रेखाटले आहे.

६ महाराजांनी भक्तीतून सामाजिक लोकशाही साधता येते हे सप्रमाण सिद्ध करून दाखविले आहे. म्हणून परमेश्वराची डोळसभक्ती केली पाहिजे असे ते म्हणतात.

७ त्यांनी पंढरपूरच्या पांडुरंगाला-विठ्ठलाला सर्वहारा वर्गाचं दैवत मानून त्याची भक्ती केली पाहिजे असे सांगतात. ते विठ्ठलाला, देवाला सरकार म्हणतात.

८ संत गणपती महाराजांनी कर्माला महत्व देत मूर्तीपूजेला विरोध केला आहे. त्यांना स्पृश्य-अस्पृश्यता मान्य नव्हती.

९ त्यांनी सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार केला. सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदत आपले कल्याण करून घेतले पाहिजे असे ते म्हणतात.

१० संत गणपती महाराजांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य प्रत्यक्ष कृतीतून केले. त्यांनी अस्पृश्य समाजाचे एकीकरण करण्याचा प्रयत्न केला.

११ महाराजांनी १९२९ ला वऱ्हाड मध्य प्रांत अस्पृश्यता निवारण परिषद मंगरूळ दस्तगीर येथे आयोजित करून त्यांनी विठ्ठल मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करून दिले. ही त्याकाळची फार क्रांती होती.

१२ जातीनिर्मूलन व्हावे म्हणून त्यांनी अजात निर्माण केली. अजात म्हणजे ज्याला कोणतीही जात नाही असा. ही सर्वार्थाने नवीन मांडणी महाराजांनी केली.

१३ त्यांनी स्त्रीपुरूष समानतेचा पुरस्कार करीत स्त्री मुक्तीसाठी कार्य केले.

१४ गणपती महाराजांनी मिश्र विवाहाचा विचार मांडला. केवळ विचार मांडून ते थांबले नाही तर स्वत: त्यांनी आंतरजातीय विवाह केला तसेच आपल्या मुलाचाही आंतरजातीय विवाह करून दिला.

१५ महाराजांनी आपल्या हयातीत व्यसनमुक्तीचा विचार, सावकारशाहीचा विरोध, श्रमप्रतिष्ठेला महत्त्व, हुंडा विरोधी मोहिम , भिक्षुकी व पुरोहित सत्तेविरूद्ध बंड पुकारून सामाजिक समता निर्माण व्हावी म्हणून कार्य केले.

१६ महाराजांनी हिंदु- मुस्लिम ऐक्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. मानवताधर्माचा प्रसार व प्रचार करून हिंदु-मुस्लिम ऐक्य निर्माण व्हावे म्हणून विचार मांडले.

१७ महात्मा जोतीराव फुल्यांनी सांगितलेले शिक्षणाचे महत्व गणपती महाराजांनीही अतिशय प्रखरतेने सांगितले.

१८ शिक्षण हेच समाजसुधारणेचा पाया आहे असे ठाम मत गणपती महाराजांनी मांडले आहे.

१९ संत गणपती महाराजांनी महात्मा फुल्यांनी सुरू केलेल्या सामाजिक सुधारणेचा प्रचार व प्रसार आपल्या कार्यातून केला. म्हणून संत गणपती महाराज हे महात्मा फुल्यांचे खरे वारसदार ठरतात.

२० आपल्या समाजसुधारणावादी तसेच धार्मिक सुधारणावादी विचार व कार्याला आणखी गती प्राप्त व्हावी म्हणून महाराजांनी श्वेत निशाणधारी अजात मानव संस्थेची स्थापना केली.

21 संत गणपती महाराज आपल्या मठाला 'कचेरी' संबोधतात. कारण कचेरी म्हणजे कोर्ट तेथे न्याय केला जातो. कोणावरी अन्याय होत नाही अशी भावना आहे.

(डॉ. प्रमोद गारोडे)